**अत्यंत महत्वाचे**

Phone:-022-22618987
022-22708738

सांख्यिकी कक्ष
फोर्ट
मुंबई—४०० ०३२.

**क्र. सांख्यिकी / DCF(121) / /२०१४—१५**

परिपत्रक:—

विषय:— ऑल इंडिया सर्वे ऑन हायर एज्युकेशनल इनफॉरमेशन (AISHE) सन २०१२—१३ ची माहिती ONLINE भरणेबाबत.

संदर्भ:— १) क्र उशिस/सांख्यिकी २०१३—१४/DCF (121),149/2013 dated 21St October 2013
२) शासन पत्र क्र — DCF (121), 174/2013 dated 16th November 2013
३) शासन पत्र क्र — DCF (121) 205/2013 dated 13th Decmber 2013

महोदय/महोदया,

प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालये यांचे लक्ष उपरोक्त संदर्भिय पत्रांकडे व परिपत्रकाकडे वेधण्यात येते.

देशातील उच्च शिक्षणबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सन २०१२—१३ या शैक्षणिक वर्षाच्या माहितीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व अनुदानित, विना अनुदानित व कायम विनाअनुदानित विभाग /महाविद्यालय व संस्थाकडुन ऑनलाईन पध्दतीने विवरणपत्रांमध्ये माहिती मागविण्यात आलेली आहे.

याबाबत प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालय यांना कळवू इच्छितो की, ब—याचशा महाविद्यालयांनी सदरची माहिती अद्याप भरलेली नसल्यामुळे, प्रशिक्षण—संचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून महाविद्यालयांवर कायदेशीर कारवाई का करू नये? अशी विचारणा केली आहे.

याबाबतचे गांभीर्य जाणून प्राचार्य व संचालक— संलग्नित महाविद्यालयांनी वैयक्तिक लक्ष घालुन AISHE ची माहिती दिनांक १५ मे, २०१४ पर्यंत तातडीने संबधित नोडल अधिका—यांना **online** भरण्याचे आदेश दयावेत.

त्यासाठी प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालयांनी http://aishe.gov.in or http://aishe.nic.in या वेबसाईटवर जाऊन नोंदणी करावयाची असून तेथे उपलब्ध असलेल्या विवरणपत्रांमध्ये माहिती भरावयाची आहे. या संदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी कार्यालयीन दुरध्वनी क्र. 022- 22708738 व 22618987 आणि कॉल सेंटर भ्रमणध्वनी क्र. 9527028779/ 9767295889 या क्रमांकावर संपर्क साधावा.

तरी दिनांक १५ मे, २०१४ पर्यंत प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये माहिती तात्काळ भरून पाठवावी. सदर माहिती पाठविण्यास विलंब झाल्यास शासन कारवाईस संबंधित प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालय हे जबाबदार राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई ४०००३२.
दिनांक:— ८ मे, २०१४.

नोडल अधिकारी
मुंबई विद्यापीठ.

**टिप्पणी:— प्राचार्य व संचालक—संलग्नित महाविद्यालयांनी सदरची माहिती वेळेत भरली असल्यास हे पत्र दुर्लक्षित करावे, हि विनंती.**